# प्रेसनोट

## जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता यांचेविरूध्द A.C.B. नागपूर पथकाने केली यशस्वी सापळा कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे नोंदणीकृत कॉन्ट्रॅक्टर असून त्यांनी करजखेडा जि. भंडारा येथील १० लाख रूपयाचे आणि लखमापूर जि. नागपूर येथील १५ लाख रूपयाचे पाठबंधाऱ्यांचे कामाचे एकुण प्रलंबित २५ लाख रूपयाचे बिल मंजूरीकरिता जलसंपदा विभाग, नागपूर येथे सादर केले असता ते बिल मंजूर करून देण्याकरिता आरोपी लोकसेवक श्री रविंद्र निलकंठराव वानखेडे, (**Class 1 Officer**), पद-अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी २ टक्के प्रमाणे ५० हजार रूपयेची लाचेची मागणी केल्याची तक्रार यातील तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयात केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी आज दिनांक २१/०५/२०२६ रोजी लाचेची मागणीबाबत पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री रविंद्र निलकंठराव वानखेडे, पद अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी तक्रारदार यांचे पाठबंधाऱ्याचे प्रलंबित बिल मंजुरी करिता तडजोडीअंती २ टक्के प्रमाणे ५० हजार रूपये आणि नविन काम भुराटोला जि. भंडारा आणि खडकी मायनर, नागपूर येथील १० लाख रूपयाचे पाठबंधाऱ्याचे निविदा तक्रारदार यांचे नावे मंजूर करून देण्याकरिता २ टक्के प्रमाणे २० हजार रूपये असे एकुण ७० हजार रूपये लाचेची मागणी करून स्वत: स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कारवाईअंती आरोपी लोकसेवक श्री रविंद्र निलकंठराव वानखेडे, यांना त्यांचेच कार्यालयात स्वत:चे कक्षात ७० हजार रूपये लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. आलोसे श्री रविंद्र वानखेडे यांचे अंगझडती दरम्यान त्यांचे ताब्यातुन सापळा रक्कमेव्यतिरिक्त ३६,६३०/- रू. जप्त करण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक श्री रविंद्र निलकंठराव वानखेडे विरूध्द पोलीस स्टेशन धंतोली, नागपूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक श्री जिर्तेन्द्र वैरागडे, मपोहवा अस्मिता मेश्राम, करूणा सहारे, गिता चौधरी, पोहवा आशिष वैद्य, पोशि प्रफुल भातुलकर, होमेश्वर वाईलकर आणि वाहन चालक राजेंन्द्र जांभुळकर यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

### लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअ‍ॅप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९८२३२७०५८१
**७.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०